दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.८ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २४६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 8 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 246 | Pages 4 | Rate 4 Rs

## अजित पवारांच्या पावलावर पाऊल!

**मुंबई**–राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिला आहे. त्यानंतर आता त्यांच्या जागी कोणाला संधी दिली जाणार याची चर्चा रंगली आहे. त्यात मंत्री छगन भुजबळ यांचे नाव आघाडीवर आहे. भुजबळ यांनी राज्यसभेवर जाण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र त्यांच्या जागी सुनेत्रा पवारांना संधी देण्यात आली होती. याच चर्चेत जय पवार यांच्याही नावाची चर्चा आहे. यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. विशेष म्हणजे आज त्यांनी जनता दरबार भरवला होता.खासदारकीच्या जागेवरून सुरू असलेल्या नावाच्या चर्चेवर जय पवार म्हणाले, चर्चा होत आहे पण मी इथेच सर्वांसाठी काम करेल, असे म्हणत त्यांनी त्यांच्या नावाच्या चर्चेला पूर्णविराम दिला आहे. तसेच २०२९ च्या निवडणुकीवर देखील त्यांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले, काही दिवसांपूर्वी आमची सहकाऱ्यांसोबत चर्चा झाली, सर्वच बारामतीकरांची इच्छा होती की, दादांना एकदा मुख्यमंत्री पहायचे आहे.

# ‘देवेंद्र फडणवीस नवं पुण्याचे शिल्पकार’

## झाल्यापासून पुण्यात दररोज एक बलात्कार,कोयता गँग,ड्रग्जचा विळखा,गुंडगिरी वाढली–हर्षवर्धन सपकाळ

## एपस्टिन फाईल्समध्ये नाव आल्यापासून नरेंद्र मोदी अमेरिकेच्या दबावाखाली; युद्ध बंदी, व्यापार करार, कच्चे तेल खरेदी करण्याचे निर्णय अमेरिकेकडून एकतर्फी जाहीर

## ज्या तिरंग्यासाठी हजारो लोकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तो तिरंगा RSS च्या कार्यालयावर अनेक वर्ष फडकला नाही

दैनिक वादळ वार्ता

**पुणे । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज‘नवं पुण्याचे शिल्पकार देवेंद्र फडणवीस’, असे पोस्टर्स व बॅनर्स पुणे शहरात जागोजागी झळकवण्यात आले त्याच पुणे शहरात महिलांवरील लैंगिक अत्याचार वाढले आहेत. जानेवारी ते मार्च या तीन महिन्यात लैंगिक शोषणाची ७०० प्रकरणे घडली आहेत, दररोज एक बलात्कार होत आहे.व ड्रग्जचा खुलेआम धंदा सुरु आहे. तसेच कोयता गँगचा हैदास सुरु आहे, गुलटेकडी मार्केट यार्डात गुंडांचा हस्तक्षेप वाढला आहे, याचे शिल्पकार देवेंद्र फडणवीस आहेत का? असा संतप्त प्रश्न काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विचारला आहे.

आज या पुणे महानगरपालिकेतील काँग्रेस पक्षाचे नगरसेवक प्रशांत जगताप यांच्या संकल्पनेतून संविधान चौक, वानवडी येथे उभारलेल्या ४५ मीटर ध्वजस्तंभाचा लोकार्पण सोहळा तसेच काँग्रेस कार्यकर्ता संवाद मेळावा संपन्न झाला. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित राहून काँग्रेस पक्ष व तिरंगा राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी काँग्रेस पक्षाने दिलेले योगदान तसेच इतर विषयांवर कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी पुणे काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे, माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, माजी आमदार मोहन जोशी, खजिनदार अभय छाजेड, माजी आमदार दीप्ती चवधरी, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाची सुरूवात नसरापूर, पुणे येथील ४ वर्षीय पीडित बालिका आणि महिला व बाल अत्याचारातील अन्य पीडितांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, जगात आज एपस्टिन फाईलने धुमाकुळ घातला आहे. लहान व कोवळ्या वयातील मुला मुलींचे लैंगिक शोषण करुन, त्यांच्या हत्या करण्यात आल्याचे यातून उघड झाले आहे. विकृतीचा अत्यंत घाणेरडा व किळसवाणा हा प्रकार असून यामुळे जगात भूकंप आला आहे. जगभरातील अनेक मोठ्या




पदावरील व्यक्तींनी राजीनामे दिले आहेत. याच एपस्टिन फाईलमध्ये भारतातील दोघांची नावे आहेत, एक आहेत केंद्रीय मंत्री हरदिप पुरी तर दुसरे नाव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आहे. नरेंद्र मोदी इस्त्रायलमध्ये जाऊन नाचले अशी माहिती समोर आली आहे. ही एपस्टिन फाईल उघड झाल्यापासून नरेंद्र मोदी अत्यंत दबावात काम करत आहेत. ऑपरेशन सिंदूरच्यावेळी अचानक युद्धबंदीची घोषणा अमेरिकेने केली. अमेरिकेबरोर दबावाखाली व्यापार करार करावा लागला. कच्चे तेल रशियाकडून घ्यायचे नाही, हे अमेरिका भारताला सांगत आहे आणि नरेंद्र मोदी मात्र काहीही न बोलता गप्प आहेत, कारण नरेंद्र सरेंडर झाले आहेत. एपस्टिन फाईल्ससारखे बाल लैंगिक शोषणाचे प्रकार महाराष्ट्रातही वाढत आहेत, हा काय योगायोग आहे? अशी विचारणा सपकाळ यांनी केली आहे.

आपला राष्ट्रीय ध्वज तिरंग्यासाठी हजारो लोकांनी छातीवर गोळ्या झेलल्या पण तिरंग्याचा अपमान होऊ दिला नाही. या तिरंग्यातील भगवा रंग हा त्यागाचे प्रतिक आहे. पांढरा रंग प्रकाश व सत्याचे प्रतिक आहे, तर हिरवा रंग हा सुजलाम सुफलाम म्हणून घेतला आहे तर अशोक चक्र हे गतीमानतेचा प्रतिक आहे. या तिन्ही रंगाचा कार्यकारणभाव भाजपा व रा. स्व. संघ मोडू पहात आहे. संघाने तिरंग्याला विरोध करत स्वातंत्र्यानंतर जवफवास ५०-५५ वर्षे रा. स्व. संघाच्या कार्यालयावर तिरंगा फडकवला नाही, अशा प्रवृत्तीविरोधात उभे ठाकले पाहिजे. आपली लढाई तिरंगा विरोधात काळ्या टोपीची आणि संविधान विरोधात मनुवादाची लढाई आहे असे सपकाळ म्हणाले.पुण्यात ३४ हजार कोटी रुपयांचे ५४ किलोमिटरचे भूमिगत रस्ते प्रकल्प आखण्यात आला आहे. यात मोठा भ्रष्टाचार आहे. हा प्रकल्प जाहीर करताना कोणतीही जनसुनावणी घेण्यात आलेली नाही, नगरसेवकांना विचारात घेतले नाही. हा प्रकल्प पुण्यात भ्रष्टाचाराची पाळंमुळं रोवणारा आहे, त्याच्याविरोधात आवाज उठवला पाहिजे, असेही सपकाळ म्हणाले..


# दहावीचा निकाल आज!: दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या, शुक्रवार ८ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन पद्धतीने जाहीर होणार आहे. निकालापूर्वी सकाळी ११ वाजता मंडळाकडून पत्रकार परिषद घेऊन निकालाची अधिकृत घोषणा केली जाईल, ज्यानंतर विद्यार्थ्यांना मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर आपला निकाल पाहता येईल.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या, शुक्रवार ८ मे रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. राज्य मंडळाने यासंदर्भातील अधिकृत घोषणा केली असून, परीक्षेला बसलेल्या लाखो विद्यार्थ्यांची प्रतीक्षा उद्या संपणार आहे. विद्यार्थ्यांना




मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवरून आपला निकाल पाहता येईल.

दहावीचा निकाल कुठे पाहता येणार?

https://sscresult.mahahsscboard.in/

https://results.targetpublications.org/

https://results.digilocker.gov.in

https://mahahsscboard.in

https://results.navneet.com

वर दिलेल्या संकेतस्थळांवर दहावीचा निकाल पाहता येणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने गेल्या काही वर्षांपासून दहावी आणि बारावीचे निकाल विक्रमी वेळेत जाहीर करण्याची आपली परंपरा यंदाही कायम ठेवली आहे. पूर्वी जून महिन्यापर्यंत लांबणीवर पडणारे हे निकाल आता मे महिन्यातच हाती येत असून, बारावीचा निकाल २ मे रोजी लागल्यानंतर आता दहावीचा निकालही उद्या, ८ मे रोजी जाहीर होत आहे. या तत्परतेमुळे पुढील प्रवेश प्रक्रिया आणि नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात वेळेत होण्यास मोठी मदत होणार असून, दहावीच्या निकालापाठोपाठ आता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेचा मार्गही मोकळा होणार आहे.

# डॉ.प्रतिभाताई थोरात यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

डॉ.सौ.प्रतिभाताई अशोक थोरात यांनी शिवसेना पक्षात मुंबई येथे पक्षप्रमुख उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पक्षप्रवेश केल्याबद्दल त्यांचा केज तालुका शिवसेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी शिवसेना उपनेत्या माजी आमदार संगीताताई ठोंबरे, शिवसेना तालुकाप्रमुख पृथ्वीराज पाटील, शिवसेना विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे,युवासेना तालुकाप्रमुख दत्तकुमार काकडे,शिवसेना उप तालुकाप्रमुख महेंद्र चाटे, युवासेना शहरप्रमुख आकाश चाळक, आम्रपालीताई गजेशीव, कुंबेफळचे माजी सरपंच किशोर थोरात,नवनाथ जाडकर,शुभम आप्पा गंभीरे,उमेश माने, विलास घुले व सर्व पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.यावेळी सत्कार समारंभाला उत्तर देताना डॉ.सौ.प्रतिभाताई थोरात यांनी सर्व शिवसेना पक्षप्रमुख उप मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी आपल्यावर विश्वास टाकून शिवसेना पक्षात स्वागत केले आहे. शिवसेना पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने पक्ष वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.तसेच सर्वांचे आभार मानले आहेत.आभार प्रदर्शनाने सत्कार सोहळा संपन्न झाला.

# वातावरणात बदल; पर्यटकांची माथेरानला पसंती

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज राज्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानात सातत्याने बदल होत असून अनेक भागांमध्ये अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण आणि तापमानातील चढ-उतार अनुभवायला मिळत आहेत. या बदलत्या हवामानाचा सकारात्मक परिणाम रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ माथेरान येथे पाहायला मिळत आहे. मागील दोन-तीन दिवसांपासून माथेरानमध्ये सकाळच्या वेळेत थंडगार वारे, दाट धुके आणि आल्हाददायक वातावरण निर्माण झाल्याने पर्यटकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.




सकाळच्या वेळी माथेरानमधील अनेक रस्ते आणि डोंगरदर्या दाट धुक्याने झाकल्या जात आहेत. धुक्याच्या चादरीत हरवलेले रस्ते, हिरवाईने नटलेली झाडे आणि थंडगार वाऱ्याची झुळूक यामुळे पर्यटकांना एखाद्या हिल स्टेशनमधील वेगळाच अनुभव मिळत आहे. विशेषतः मुंबई, पुणे आणि परिसरातील नागरिक उकाड्यापासून काही क्षणांचा दिलासा मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर माथेरानकडे वळत आहेत.माथेरानमधील पॉईंट्सवर सकाळी फिरताना पर्यटक सेल्फी आणि फोटोग्राफीचा आनंद घेताना दिसत आहेत. चार्लोट लेक, पॅनोरमा पॉईंट, लुईसा पॉईंट आणि इको पॉईंट परिसरात पर्यटकांची विशेष गर्दी वाढली आहे. अनेक पर्यटक घोडेस्वारी, जंगलातील फेरफटका आणि निसर्ग निरीक्षणाचा आनंद घेत आहेत.

स्थानिक व्यावसायिकांच्या मते, एप्रिल आणि मे महिन्यात वाढणाऱ्या उष्णतेमुळे काही प्रमाणात पर्यटकांची संख्या घटली होती. मात्र आता वातावरणात गारवा निर्माण झाल्याने हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि स्थानिक व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे. विकेंडच्या काळात पर्यटकांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# अंगणवाडी मदतनीस वर एक वर्षापासून अत्याचार

## युसूफ वडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील एका खेडेगावातील ३० वर्षीय अंगणवाडी मदतनीस हिला लस्सीतून गुंगीचे औषध देऊन ती बेशुद्ध झाल्यानंतर तीचे फोटो, आणि व्हीडिओ काढले. व हे फोटो आणि व्हीडिओ समाज माध्यमा वर व्हायरल करण्याची व जीवे मारण्याची धमकी देऊन एक वर्षांपासून कळंब,केज येथील विविध लॉजवर व पीडितेच्या गावी बळजबरीने एक वर्षांपासून बलात्कार केल्याच्या पीडितेने दिलेल्या फिर्यादी वरून विकास लक्ष्मण खाडे रा. संभाजीनगर,कळंब याच्या विरुद्ध युसूफ वडगाव पोलिसात गून्हा नोंद झाला असून आरोपीला जेरबंद करण्यात आले आहे.




केज तालुक्यातील एका खेडेगावात अंगणवाडी मदतनीस म्हणुन कार्यरत असलेल्या ३० वर्षीय महिलेची कळंब येथील संभाजीनगर येथे राहणाऱ्या विकास लक्ष्मण खाडे याच्याशी ओळख झाली.त्यातून जवळीकता वाढत गेल्या मुळे एक दिवशी आरोपीने पिडीत महिलेला लस्सी मधून गुंगीचे औषध देऊन ती बेशुद्ध झाल्यानंतर तीचे नको त्या अवस्थेतील फोटो आणि व्हीडिओ काढले.व तिच्यावर कळंब येथील बालाजी लॉज,प्रेरणा लॉज,केज येथील सागर /प्रताप लॉज,आणि पीडितेच्या गावी मे २०२५ ते २२ एप्रिल २०२६ रोजी रात्री ९-३० वाजण्याच्या दरम्यान या कालावधीत फोटो व व्हीडिओ व्हायरल करण्याची धमकी व जीवेमारण्याची धमकी देऊन वारंवार बळजबरीने अत्याचार व बलात्कार केल्याची फिर्याद पिडीत महिलेने दिल्या वरून विकास लक्ष्मण खाडे रा. संभाजीनगर,कळंब याच्या विरुद्ध युसूफ वडगाव पोलिसात गून्हा नोंद झाला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांनी पीडितेच्या गावी जाऊन चौकशी केली.याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक भीमराव मांजरे हे पुढील तपास करीत आहेत.

# संपादकीय

## वेदनेचा हुंकार

अंधारल्या दिशांना दु:खाची सल सलीला घायाळ जखमांचे भय भयाला भयावह अनामिक चिंता चिंतेच्या जोडीला चितेची वाट वाटेशी दटावत वृत्तींचा घाट घाटावर ऐकवत नाही चित्कार देहाला सोसवत नाही वार अंगाखांद्यावर स्पर्शाचा भार ऐ माय मी मरते वारंवार.

लहान–मोठ्या मुली ते विधवा, परित्यक्ता, वयोवृद्ध महिलांवर वैमनस्यातून होणारे अन्याय, अत्याचार, घरंदाज विवाहितांचे संशयास्पद मृत्यू, आत्महत्या प्रकरण म्हणजे समस्त स्त्री वर्गाची शारीरिक, मानसिक चाळण करण्याचे दरमहा वाढीस लागलेले प्रकार. या छिन्नविछिन्न करणाऱ्या मरणासन्न अवस्थेतून जाणं यासारखी क्लेषकारक घटना नाही. आजची उद्विग्न परिस्थिती ही याचं उत्तम द्योतक आहे. ढासळलेली व्यवस्था, बंदिस्त चौकट, राजकारणातले कैक डावपेच, न्यायप्रतीक्षेच्या विलंबित सहयोगामुळे विदारक स्थिती निर्माण झाली आहे, जी स्त्री–पुरुष समानता निवाड्याच्या संदर्भात उलटी खेळी खेळते. आचार–विचारांच्या सदाचारी मूल्यांना पायदळी तुडवण्याचे प्रकार वारंवार घडतात. जेव्हा यंत्रणा चौकटी बाहेरचा न्याय देऊ शकत नाही, तेव्हा समाजाभिमुख मानसिक संतुलनाचा विषय मुख्य ठरतो. आजच्या घडीला मानसिक स्वास्थ्याकडे गांभीर्याने पाहण्याची, तिची मशागत करण्याची गरज आहे.एकविसाव्या शतकात आपण स्त्री–पुरुष समानतेचे गोडवे गातो. ते गाताना आपण थकत नाही. स्त्री म्हणजे माता, भगिनी ते देवस्वरूप भवानी आई. नारायणी रूपात आपण तिची पूजा बांधतो. कवन रचतो, गुणगान गातो. पण एका मोहाच्या क्षणी अमानवी अजगरी पाशात तिला अडकवलं जातं. वाममार्गे गुंगीच्या औषधांचा उतारा दिला जातो. राक्षसी वृत्तीचे व्रण शरीरभर उमटताना गुप्तांगावर वार करत अश्लील व्हिडीओ समाजमाध्यमात पसरवण्याची धमकी दिली जाते. शेवटी बलात्कार करून, खून करून तिची विल्हेवाट लावली जाते. ओळख मिटवली जाते. हा बदल एका दिवसातला नसतो, तर पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलेलं असतं तेव्हा तो जाणवू लागतो. शरमेने मान खाली घालायला लावणाऱ्या विटंबना भयंकर कृत्याच्या मालिका षंढ समाजात रुजत आहेत. समाजात जेव्हा काही वेगळं घडतं तेव्हा त्याची सुरुवात चार भिंतीतल्या कुटुंबाच्या आत होत असते. लैंगिक शोषण असो वा अनैतिकता, व्यभिचार वा विवाहबाह्य संबंध असो नराधमाला पाठीशी घालणारी घरची देखील यात सामील असू शकतात. यास्तव बाईकडे पाहण्याचा दृष्टिकोनहीन आणि समस्त स्त्रीवर्गाला अधाशी वासनांध नजरेतून पाहण्याची जणू मुभा प्राप्त झाली असावी असा झाला आहे. संशय निर्माण करणाऱ्या नात्यातली तेढ वाढत जाऊन अनैतिक संबंध, पुनर्विवाह, पती–पत्नी, प्रियकर–प्रेयसी त्रिकोण, कुणाचा पायपोस कुणाला नसल्याने कुणीही यावे टपली मारून जावे, बघू नये, बोलू नये, गुपचूप बसावे अशा प्रकारच्या कर्मकांडाला आपणचं खतपाणी घालत आहोत.कुस्करली कोवळी काया दाह भरले भेदरले अंग देहाचे भग्न अवशेष मुग्धकलिका छिन्नविछिन्न दल नाजूक भावकळ्यांचे पाऊले चिमुकली सानुली कळी खुलण्याआधी परतली न मागे फिरली, परतली न मागे फिरली.नसरापूर घटनेतील छोट्या चिमुकलीवर शब्दांत भावना व्यक्त करणं कठीण आहे. जो अत्याचार झाला त्याची जखम खोलवर आहे. आतून काही तुटल्यासारखं होताना वेदनेचा आवाज गपगार झाला आहे. आज पाशवी अत्याचार करणारे विकृत नराधम आणि उर्वरित व्यवस्था बाईचा आवाज दडपून टाकतील, पण उद्या हाच आवाज प्रतिरोधाच्या आगीत तुम्हाला भस्म करेल. आजची स्त्री सुरक्षित आहे का? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. सर्वांच्या नजरा त्याकडे लागून राहिल्या आहेत. माणूस माणसापासून दूर जात आहे. सहनशक्तीचा कडेलोट होतोय. प्रश्नमंजूषा पेटून उठली आहे. या सगळ्याला जबाबदार कोण? मानसिक विकृती की भाग्यशाली संस्कृती याची जाणीवपूर्वक विचार करून उत्तरं देण्याची वेळ आली आहे. फाशी देऊन, बंदुकीच्या गोळ्या घालून, रस्त्यात जमावाकडे सुपूर्द करून, कडेलोट, जन्मठेप देऊन नराधम माणूस मरेल, पण शिक्षा इतकी भयंकर हवी की ही नालायक 'वृत्तीचं' मरायला हवी. माजलेल्या भेकड वाकडतोंड्या नराधमाला आलेली हिम्मत मारायला हवी. याला फाशी देणं म्हणजे याची क्षणात सुटका करणे, असे न करता याच्याच मार्गावर असणाऱ्यांना हादरवून सोडणारा भयंकर मृत्यू याला द्यायला हवा. अखेर मृत्यू म्हणजे सुटका वाटायला हवी.मर्यादा ओलांडणाऱ्या महिन्याभरातल्या घटना पाहता हे जग आपल्यासाठी नाही याची खात्री पटत चालली आहे. मानवी मनातली गुंतागुंत पाहता माणसं विरुद्ध वाढत चाललेल्या विकार विकृतीची नशा जोर धरू लागली आहे. अशा क्रूर निर्दयी मानसिकतेला बदलणं अशक्यप्राय गोष्ट आहे. कारण जगात माणूसपण संपत चाललंय तसा चांगुलपणा पानावरील मिठासारखा केवळ नावालाचं उरलाय. पुढच्या काळात बाईच्या जातीला काय काय वाढून ठेवलं असेल सांगता यायचं नाही. स्पर्श न कळण्याइतपत ती बधिर नाही पण अव्यक्त जळजळीत नजरेचा स्पर्श किती खोल रुततो हे तीच तिचं जाणो. लहानपणापासूनच्या अनेक स्पर्शात वासना, कित्येक चाळे कशावरून तिने अनुभवले नसतील? ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. जागोजागी अंगाखांद्यावर रुळलेले, रस्तोरस्ती, घरादारांत, शाळा, कॉलेजमध्ये अनामिक चाटून गेलेल्या कितीतरी स्पर्शांची कथा विचार करायला लावणारी आहे. यावर खबरदारीचा उपाय म्हणून स्वतःच्या आणि मुलीच्या सुरक्षिततेची उपाययोजना हवी. काळ सोकावला असता मुलींच्या जन्मामागे पुरुष वर्ग विचाराधीन होईल. काळजी करेल. आई–बापाच्या पोटी कन्या युक्त भीतीच्या भिंती उभ्या राहतील. हीच भीती मनात घेऊन मुली जन्म घेतील. बाप आणि आजोबा सोडला तर कुठेही कुणाबरोबर जाण्याची भीती कन्या बाळगतील. न्यायप्रवीष्ट व्यक्त होण्याचे सारे मार्ग बंद होतील. एव्हाना व्यक्ततेत बदल झाला असता, तर सगळं चित्र पालटलं असतं. पण असं होत नाही, उलट आवाज दडपवण्याच्या प्रयत्नात नराधम रातोरात सुटल्याचे आपण पाहतोय. त्यांचाच जय होतोय. अशा घटनेतून पृथ्वीचा विनाश काळ जवळ येण्याचे संकेत खऱ्या अर्थाने मिळू लागले आहेत. खून, मारामाऱ्या, दरोडे, लुटमार, बलात्कार, अब्रूचे धिंडवडे, व्यभिचार, भ्रष्टाचार या साऱ्यांनी डोकं वर काढलं आहे. अत्र तत्र सर्वत्र अराजकतेचं राज्य पसरलंय. मोर्चे, आंदोलन, नैसर्गिक हानी, जाळपोळ, आगीच्या घटना या सगळ्या हानिकारक गोष्टी मानवाला, चराचराला संपुष्टात आणतील. मरण दाराशी येऊन थांबलंय तसे आपण डोक्यावर जास्तीचा भार घेऊन जगतोय. यामध्ये 'विनाशकाले विपरीत बुद्धी'चा परिणाम भयंकर असेल. यात आपल्या कित्येक पिढ्या जळून खाक होतील. तेव्हा आता खरी गरज आहे शांततेची, मग्नतेची, स्वत:मध्ये डोकावण्याची. जग बदलायच्या प्रयत्नात आपण बिघडत चाललो आहोत. सुधारणा करून चांगलं वागण्याचा प्रयत्न तरी करून पाहूया. आत असलेला काळाकुट्ट अंधार नाहीसा करू या. मनातल्या जळमटीला तिलांजली वाहू या. अति रागलोभाचे निरसन करू या. हिंसक विचार प्रयत्नपूर्वक सोडू या. स्वतःपासून केलेली सुरुवात हीच खरी सुरुवात असेल. नांदी असेल. जोवर पृथ्वी आहे तोवर जग आहे. जगावेगळी सृष्टी स्थावर आहे. तेव्हा हे सुंदर जग सानुल्या चिमुकल्या जीवांसाठी विश्वासार्ह जगण्यालायक आणि आनंदी राहण्यायोग्य बनवण्याच्या प्रयत्नात माणूस म्हणून जगताना या साऱ्या गोष्टींचं भान ठेवू या.

# नसरापूर घटनेचा रावेरमध्ये तीव्र निषेध; तहसीलदार यांना निवेदन देऊन फास्ट ट्रॅक कोर्टाची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**जळगाव । जितु इंगळे**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे घडलेल्या अमानुष आणि संतापजनक घटनेचे पडसाद आता संपूर्ण राज्यात उमटत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ रावेर (जि. जळगाव) येथील विविध सामाजिक संघटना आणि संतप्त नागरिकांनी एकत्र येत रावेर तहसील कार्यालयावर धडक दिली व प्रशासनाला निवेदन सादर केले.



या निवेदनातून नागरिकांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या असून खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत:या प्रकरणाचा खटला झजडउज अंतर्गत फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून दोषींना लवकरात लवकर कठोर शासन व्हावे.पीडित कुटुंबाला न्याय: तातडीने आणि संरक्षण मिळवून द्यावे.राज्यात वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी.

अशा अमानुष घटनांमुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरलेला नाही, हे यातून स्पष्ट होते. सरकारने कठोर पावले उचलून महिलांना सुरक्षित वातावरण द्यावे, असे मत आंदोलकांकडून व्यक्त करण्यात आले.

निवेदन देणारे मान्यवर या प्रसंगी शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते,

सौ. संगीता भास्कर महाजन ,सौ डॉ योगिता संदीप पाटील ,जयंत कुळकर्णी,पद्माकर महाजन,प्रकाश मुजुमदार, प्रल्हाद महाजन,सौ. सुवर्णा जे. भागवत रविंद्र पाटील, प्रकाश जोशी ,सौ. जयश्री अ. शिंदे यशवंत पाटील, योगीराज पाटील, दिलीप वैद्य, दिलीप कांबळे

डॉ. राजेंद्र पाटील, लखमसी पटेल किशोर पाटील, योगेश पाटील व ईतर मान्यवर उपस्थित होते .रावेरमधील या आंदोलनामुळे प्रशासनावर दबाव निर्माण झाला असून, आता शासन यावर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सुनेत्रा पवार यांनी दिला राजीनामा;त्यांच्या रिक्त जागी भुजबळांच्या नावाची चर्चा

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात महायुती मधील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार बारामती मतदारसंघातील पोटनिवडणूकीत निवडून आल्याने त्यांनी आज आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यांनी आज उपराष्ट्रपती तथा राज्यसभेचे सभापती सी पी राधाकृष्णन यांची भेट घेऊन आपला राजीनामा सुपूर्द केला. दरम्यान, सुनेत्रा पवार आपल्या दिल्ली दौऱ्यात भाजप पक्षश्रेष्ठींचीही भेट घेण्याची शक्यता आहे. त्यांच्या रिक्त जागी राज्यातून छगन भुजबळ यांच्या नावाची चर्चा आहे.सुनेत्रा पवार यांची १८ जून २०२४ रोजी राज्यसभेच्या सदस्यपदी बिनविरोध निवड झाली होती. तेव्हापासून त्या दिल्लीच्या राजकारणात सक्रिय झाल्या होत्या. परंतू अजित पवारांचे गत २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झाल्याने त्यांना राज्यात परतावे लागले. त्या सध्या सत्ताधारी राष्ट्रवादीच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून राज्यात कार्यरत आहेत. नियमानुसार, कोणत्याही व्यक्तीला एकाचवेळी दोन संसदीय सभागृहांचे सदस्यपद भूषवता येत नाही. त्यामुळे बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत विजय झाल्याने त्यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागला.सुनेत्रा पवार यांच्या या राजीनाम्यामुळे त्यांच्या पुढील राजकीय भूमिकेचा मार्ग अधिक स्पष्ट होणार आहे. आता सुनेत्रा पवार यांच्या रिक्त जागेवर कुणाची नियुक्ती होणार? याची चर्चाही राजकारणात सुरू झाली आहे.आपल्या दिल्ली दौऱ्यात सुनेत्रा पवार भाजपच्या काही ज्येष्ठ शिर्ष नेत्यांचीही भेट घेणार अशी चर्चा आहे.या संभाव्य भेटींमध्ये राज्यातील राजकीय घडामोडी, महायुती सरकारमधील समन्वय, आगामी निवडणुकांची तयारी आणि धोरणात्मक मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. सुनेत्रा पवार यांच्या दिल्ली दौऱ्याकडे राज्यातील सर्वच पक्षांचे लक्ष लागले आहे. त्यांच्या राजीनाम्याच्या निर्णयामुळे राज्यसभेतील जागेवरही परिणाम होणार आहे. विशेष म्हणजे त्यांचे पुत्र पार्थ पवार यांची या पुर्वीच राज्यसभेवर निवड झाली आहे. विधानसभेत त्यांच्या सक्रिय सहभागामुळे राज्यातील सत्तासमीकरणांवरही परिणाम होऊ शकतो. या दौऱ्यानंतर त्यांच्या पुढील



राजकीय हालचाली काय असतील, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

**छगन भुजबळ यांच्या नावाची चर्चा तर प्रफुल पटेलांचं काय**

सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्याने रिक्त झालेल्या जागेवर कुणाची वर्णी लागणार, याबाबत राज्यात जोरदार चर्चा सुरू आहे. यामध्ये तीन प्रमुख नावांची चर्चा असून, त्यापैकी ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचे नाव आघाडीवर आहे. भुजबळ सध्या राज्यात फडणवीस सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री असून, राज्यसभेची उमेदवारी देऊन त्यांना राष्ट्रवादीच्या कोट्यातील केंद्रात मंत्रिपद दिले जाणार असल्याचे बोलले जात आहे. दुसरे महत्त्वाचे नाव जय पवार यांचे आहे. सुरुवातीला त्यांना विधान परिषदेवर पाठविण्यात येणार होते. परंतू पक्षाने झिशान लसिद्दिकी यांच्या नावाची घोषणा केली. त्यामुळे जय पवार यांना राज्यसभेवर पाठवले जाणार का, जर तसे झाले तर पार्थ पवार आणि जर जय पवार एकाच सभागृहात असतील. तिसरे नाव म्हणजे नितीनकाका पाटील. लोकसभा निवडणूकी दरम्यान सातारा लोकसभा मतदारसंघात वाई येथील एका प्रचारसभेत त्यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नितीनकाका पाटील यांना राज्यसभेवर पाठवण्याचे जाहीर आश्वासन दिले होते. आता अजित पवार यांच्या पाश्चात पक्षाकडून हा शब्द पाळला जातो का, छगन भुजबळ, जय पवार की नितिनकाका पाटील यांची वर्णी केंद्रीय मंत्री पदी लागणार का याकडेही राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागून आहे.

# सुनील भाऊ पवार वडार भूषण पुरस्काराने सन्मानित



**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील वडार समाज महाराष्ट्र मजूर शिल्प प्रतिष्ठान यांच्या वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आले. २०११ ला शिल्पाचे अनावरण झाल्यापासून गेल्या १५ वर्षापासून कामगार दिनाला समाजाचे तोरण बांधून प्रतिष्ठान च्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, कला, साहित्य, राजकीय विविध क्षेत्रातील समाज बांधवाचे शिल्पकार गौरव, गुणगौरव,सत्कार मूर्ती उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल सत्कार केला जातो यंदाही वैष्णवी जाधव,प्रतिक्षा पवार, भिमा पवार, मच्छिंद्र चव्हाण, रामू लष्करे, सचिन भोसले, राजू चव्हाण (गुजरात)श्री सुनिल भाऊ पवार धाराशिव व श्री तुकाराम चव्हाण लातूर व राजेंद्र धोत्रे सासवड पुणे व श्री ज्योती चौगुले सोलापूर व श्री लक्ष्मण ईटकर तुळजापूर व श्री अमर पवार कोल्हापूर यांचा सन्मान चिन्ह व सोलापूर कापडी गुलदस्ता देऊन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक टि. एस. चव्हाण तसेच प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पश्चिम महाराष्ट्र विभागाचे मुख्य अभियंता. श्री. कालिदास भांडेकर, भारतीय सैनिक कर्नल रूषीकेश धोत्रे उपस्थित होते. वडार मजूर दाम्पत्य शिल्पास विधानपरिषद आमदार अमित गोरखे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवी लांडगे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, कला,क्रिडा, साहित्य व सांस्कृतिक सभापती कैलास कुटे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थानिक नगरसेवक कुशाग्र कदम,नगरसेविका वैशाली काळभोर, मा. प्रकाश बाबर, सौ ऐश्वर्या अमित बाबर अश्विनी वाबळे राहुल पाटील, विशाल काळभोर,दत्ता देवतरसे उपस्थित होते. सर्वांनी मिळून दीपप्रज्वलन, व महाराष्ट्र चे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून स्वर्गीय गायिका आशा भोसले, बाबा आढावा या सर्वांना श्रध्दांजली अर्पण केले तदनंतर महाराष्ट्र गीत म्हणून कार्यक्रम आरंभ केले प्रसत्विक भाषण संस्थापक अध्यक्ष शामराव विटकर यांनी केले त्यानंतर महापौर रवी लांडगे यांनी आपल्या भाषणात वडार समाजाचे इतिहास व पिंपरी चिंचवड शहर घडवण्यासाठी दिलेले योगदान याचा उल्लेख केला आजचा दिवस दुग्धशर्करा आहे कारण बौध्द पोर्णिमा, महाराष्ट्र दिन, कामगार दिन, मराठी भाषिक दिन हा एकाच दिवशी आले असे सांगितले त्यांनी सगळ्याचे आभार मानले. त्यानंतर भाऊसाहेब भोईर यांनी वडार समाजाशी माझे नाते आहे मी पण यांच्यातील एक आहे कारण तळेगाव माजी नगराध्यक्ष सुरेश धोत्रे हे माझे गुरू बंधू आहेत त्यामुळे समाजाशी माझे नाते आहे वडार मजूर शिल्प प्रतिष्ठान दरवर्षी चांगले उपक्रम घेते त्यांनी खूप कौतुक केले. त्यानंतर उपमहापौर यांनी दाम्पत्य शिल्प छान आणि पिंपरी चिंचवड जडणघडणीचा वास्तविकता दर्शवणारी प्रतिमा असल्याचे सांगितले. सभापती कैलास कुटे यांनी वडार मजूर दाम्पत्य शिल्पाच्या कार्यक्रम साठी शुभेच्छा दिल्या तसेच कला, क्रीडा, साहित्य आणि सांस्कृतिक विभाग त्यांच्या कडे असल्याने त्यांच्या पदाचा खरा सन्मान या कार्यक्रमासाठी उपयोगी ठरल्याचे समाधान वाटले येणाऱ्या काळात अजून काही सांस्कृतिक कार्यक्रम संस्थेचे वतीने राबविले तर नक्कीच पाहिजे ते मदत देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. समाजातील भारतीय सैनिक कर्नल धोत्रे यांनी कर्नल पदावर कसे गेले व त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी केलेल्या कार्य संगितले समाजातील तरूणांनी सैन्य मध्ये जावे असे मार्गदर्शन केले. एकता परिषद चे अध्यक्ष भरत विटकर यांनी समाजाचे इतिहास समाजातील लोकांनी नेमके काय करावे याच्या वर व्याखान दिले. यावेळी मंत्रालय टिम सुधीर पवार, नितीन आण्णा धोत्रे, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप पवार, नवी मुंबई सागर चौगुले, संदीप शिंदे, सोलापूर रवी शिंदे,विष्णू चौगुले,शिर्डी एक्सप्रेस चे संपादक रमेश जेठे, पुणे चे मा उपमहापौर मुकारी आलगुडे,संदीप पवार, हरिष बंडीवडार, अशोक पवार, सदाशिव जाधव,मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार सचिव लखन पाटकर यांनी केले तर सन्मान पुरष्कार सौजय कै. विठ्ठल मारुती विटकर कै. सावित्रीबाई आपल्या आई वडिलांच्या स्मरणार्थ

सामाज्याला पेरणा मिळाला

चिन्हे सौजन्य अनिल विटकर तर सूत्रसंचालन अर्मताश्वरी यांनी केले.

अन्नदान व्यवथा सौजन्य. मा. पिंटू जाधव यांनी केले

वडार समाज महाराष्ट्र मजूर शिल्प प्रतिष्ठान चिंचवड पुणे

संस्थापक अध्यक्ष, शामराव विटकर

संयोजन :– अध्यक्ष नागेश पवार, सहसचिव अमर दौंडकर, सागर ओरसे,पिंटू जाधव, अनंत नलावडे, राजु कुसाळकर, सुनिल शेलार,दिलिप मुरकुटे सचिन चौगुले अन्य कार्यकर्त होते

# केज उपजिल्हा रुग्णालय शस्त्रक्रियात जिल्ह्यात अव्वल; रुग्णसेवेचा उच्चांक

**उपलब्ध सुविधा**

एक्स-रे, सोनोग्राफी, सिटीस्कॅन, यासह डायलिसिस ची सुविधा नव्याने सुरू झालेली आहे यामुळे मूत्रपिंड विकाराच्या रुग्णांना उपचाराची सोय झाली आहे. रुग्णांना सेवा देण्यासाठी आम्ही पूर्ण क्षमतेने काम करत आहोत.




दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथील उपजिल्हा रुग्णालयाने आरोग्य सेवेमध्ये एक मोठी झेप घेतली आहे. दर्जेदार उपचार आणि यशस्वी शस्त्रक्रियांच्या जोरावर या रुग्णालयाने संपूर्ण जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, सर्वसामान्यांसाठी हे रुग्णालय आता एक मोठा आधारवड ठरत आहे. उपजिल्हा रुग्णालयाने मागील वर्षभरात २११७ शस्त्रक्रिया करून प्रथम क्रमांकावर उच्चांक गाठला आहे. वैद्यकीय अधीक्षकजनरल सर्जनडॉ दत्तात्रेय केंद्रे . स्त्री रोग तज्ञ डॉ केशव इंगोले, शस्त्रक्रिया विभाग प्रमुख डॉ चाळक भाऊसाहेब,डॉ स्वाती साखरे , भूलतज्ञ डॉ दिगंबर मुंडे ,श्रीमती डॉ पाटील , बालरोग तज्ञ डॉ सावंत बालासाहेब , डॉ निवृत्ती मुंडे, ऑर्थो तज्ञ डॉ अमोल गीते,डॉ श्रीकृष्ण म्हात्रे, नेत्रचिकित्सा विभाग डॉ सुमित कुलकर्णी,डॉ पाटील,डॉ घुगे,डॉ हजारे,डॉ पवार,श्रीमती शस्त्रक्रियागृह विभाग प्रमुख श्रीमती साळवे , रक्तपेढी विभाग श्रीकृष्ण नागरगोजे श्री महादेव इंगळे,श्रीमती सोनवणे .श्रीमती गवळी, परमेश्वर राऊत, अमर वाघमारे आदींसह रुग्णालयातील सर्व डॉक्टर, कर्मचाऱ्यांच्या सेवेतून रुग्णांना आधार मिळत आहे. स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया, मोतीबिंदू शस्त्रक्रिया गाठ काढणे,हर्निया,हाडांच्या शस्त्रक्रिया अशा सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अविरतपणे केल्या जात आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांना अशा विविध सुविधा मोफत उपलब्ध झाल्यामुळे त्यांना खाजगी रुग्णालयात जाण्याची गरज भासत नाही.

**वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय केज-डॉ दत्तात्रय केंद्रे**

बीड जिल्ह्यातील एकूण ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयातुन केज उपजिल्हा रुग्णालय सर्वाधिक यशस्वी शस्त्रक्रिया करून उच्चांक गाठला याबद्दल स्त्री रोगतज्ञ डॉ केशव इंगोले,डॉ चाळक यांचा रुग्णालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या यशस्वी शस्त्रक्रिया बद्दल रुग्णांनी समाधान व्यक्त केले आहे.

## लोक सेवा आयोगाच्या परिक्षेत उत्तीर्ण होऊन कात्रीची अंजना पावरा झाली पोलिस उपनिरीक्षक



दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

धडगाव तालुक्यातील कात्री गावाची सुपुत्री तसेच आचपा (लटकुवा ) गावाचे
वनकर वेस्ता पावरा यांची सुन अंजना मनोज पावरा यांनी महाराष्ट्र लोक सेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करुन पोलीस उप निरीक्षक पदावर मजल मारली आहे.

अंजना मनोज पावरा यांची सन २०१९ मध्ये मुंबई शहरात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून नियुक्ती झाली होती. अंजना पावरा यांनी नऊ महिन्याचे खडतर पोलीस प्रशिक्षण पूर्ण करुन मुंबई येथे कर्तव्य बजावत जिद्द व चिकाटीने महाराष्ट्र लोक सेवा आयोगाचा अभ्यास केला. कौटुंबिक जबाबदारी व कर्तव्य पार पाडत कठीण परिस्थितीवर मात करत महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत महाराष्ट्रात खुल्या प्रवर्गातून ३५२ वा रँक मिळवत अंजना पावरा यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल धडगाव तालुक्यातील जनसामान्यांसह आप्तेष्ट नातेवाईक यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. तसेच दोहाण्या वेस्ता पावरा, वनकर वेस्ता पावरा, खारकीबाई वनकर पावरा, मानसिंग वेस्ता पावरा, सखाराम वेस्ता पावरा, मनोज वनकर पावरा, भरत दोहाण्या पावरा, रमेश दोहाण्या पावरा, विरसिंग मानसिंग पावरा, रघुनाथ लोटन पावरा आदींनी अंजना पावरा यांचे अभिनंदन केले आहे.

## केज तालुक्यातील सुर्डी पाटी येथे काठीने मारहाण करून टिप्पर चालकाचा खुन,आरोपी जेरबंद

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात सुर्डी येथे काठीने मारुन एका टिप्पर चालकाचा खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,खुशालराम बलभीम ठोंबरे वय ५५ वर्ष रा. सुर्डी ता.केज असे मयताचे नाव असून, खुशालराम ठोंबरे आणि ग्रामपंचायत कर्मचारी आरोपी मंगेश भरत माने या दोघांचे घरगुती कारणावरुन सोमवारी वाद झाला होता. मंगळवार दि.५ मे रोजी खुशालराम ठोंबरे हे सुर्डी फाटा येथे एका हॉटेल मध्ये बसलेले असताना त्यांना आरोपी मंगेश माने आणि आणखी एकाने असे दोघांनी मिळून सोमवारी झालेल्या वादाच्या कारणावरून काठीने बेदम मारहाण केली.या मारहाणीत खुशालराम ठोंबरे हे गंभीर



जखमी झाले होते.त्यांना तातडीने कळंब येथे उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले.मात्र दवाखान्यात पोहोचताच डॉक्टरांनी तपासणी करुन मृत घोषित केले. याप्रकरणी युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच याप्रकरणी आरोपी मंगेश भरत माने यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.या घटनेने केज तालुक्यात खळबळ उडाली आहे.मयत टिप्पर चालक खुशालराम बलभीम ठोंबरे यांचा मुलगा बालाजी खुशालराम ठोंबरे यांच्या फिर्यादीवरून मंगेश भरत माने याच्या विरुद्ध दि.५ मे रोजी रात्री ८-३० वाजण्याच्या सुमारास गु. र.नं.१२४/२०२६भा.न्या. सं.१०३(१) नुसार युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.गुन्हा दाखल होताच पोलिसांनी भरत माने याला ताब्यात घेतले आहे.या प्रकरणी मयत टिपर चालक खुशालराम बलभीम ठोंबरे यांच्यावर धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.या प्रकरणी युसुफवडगाव पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे हे पुढील तपास करीत आहेत.

## सुट्टीत आजोळी आलेल्या तरुणाने केला मामाच्या दहा वर्षीय चिमुरडीवर अत्याचार; केज तालुक्यात महिला अत्याचाराची आठवड्यातील तिसरी घटना

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसुफ वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे.उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाच्या गावाला आलेल्या एका २९ वर्षीय नराधम भाच्याने आपल्याच १० वर्षांच्या अल्पवयीन चुलत बहिणीवर मामाच्या मुलीवर अत्याचार केला. ही धक्कादायक घटना उघडकीस येताच परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपीला इटकूर येथून बेड्या ठोकल्या आहेत.या नराधमावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.याबाबत



सविस्तर वृत्त असे की, पीडित मुलीचे आई- वडील रात्रीच्या वेळी शेतात पिकाला पाणी देण्यासाठी गेले होते. घरात मुलगी एकटीच असल्याचे पाहून आरोपीने या परिस्थितीचा गैरफायदा घेतला आणि हे घृणास्पद कृत्य केले.कृत्य केल्या नंतर आरोपीने मामा घरी येण्यापूर्वीच तिथून पळ काढला.मात्र,पालकांनी घरी परतल्यानंतर पीडितेने घडलेला सर्व प्रकार त्यांना सांगितला. या घटनेने हादरलेल्या पालकांनी तात्काळ युसुफ वडगाव पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने शोधमोहीम राबवली आणि आरोपीला इटकूर परिसरातून ताब्यात घेतले.विशेष म्हणजे, युसुफ वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या तीन दिवसांतील ही तिसरी मोठी गुन्हेगारी घटना आहे.यापूर्वी एका आजोबांनी नातीवर केलेले अत्याचार आणि अंगणवाडी सेविकेवर गुंगीचे औषध देऊन झालेल्या अत्याचाराच्या घटना ताज्या असतानाच या नवीन प्रकारामुळे महिला आणि बालिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलीस या सर्व प्रकरणांचा सखोल तपास करत असून गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

## दौंडमध्ये ९ वर्षांच्या मुलीची निर्घृण हत्याप्रकरणाची उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्याकडून गंभीरपणे दखल

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । अरविंद बनसोडे**

दौंड तालुक्यातील देऊळगाव राजे येथे अवघ्या ९ वर्षांच्या मुलीची हत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेची विधानपरिषद उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गंभीरपणे दखल घेत, पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक यांना लेखी निवेदन दिले आहे. या निवेदनाद्वारे डॉ. गोऱ्हे यांनी सखोल तपास, तांत्रिक व भौतिक पुरावे गोळा करण्यासह खटला फास्ट ट्रॅक कोर्ट मध्ये चालवण्याची मागणी केली आहे. पीडित कुटुंबातील इतर सदस्यांना, विशेषतः साक्षीदार असलेल्या लहान मुलाला योग्य संरक्षण देण्याची आणि पीडित कुटुंबियांना कुशल वकील उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे.ही अत्यंत हृदयद्रावक आणि मन हेलावणारी घटना आहे. एक चिमुरडी मुलगी किरकोळ कारणावरून मारली जाणे हे अत्यंत गंभीर आहे. समाजात योग्य संदेश जाण्यासाठी आरोपीला कठोर शासन झाले पाहिजे.



साक्षीदार असलेल्या लहान मुलाला सुरक्षित व मानसिक दिलासा देता येईल अशा ठिकाणी व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच त्याचे मानसिक समुपदेशन करणे गरजेचे आहे. यासारखीच घटना सांगलीतील आटपाडी मध्ये दि.२७ मार्च दोन मुलींना उलटे टांगुन ठेवल्याने एका मुलीचा मृत्यु झाल्याची घटना घडल्याचे असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद करून आई वडिलांना वा कुटुंबीय यांच्या नकारात्मक भुमिकेवर काम करायची गरज व्यक्त केली

## अनाथ आश्रमात खाऊ वाटप करून संतोष रासवे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा



दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथील पत्रकार संतोष रासवे तथा सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय असलेले संतोष रासवे यांचा वाढदिवस अतिशय प्रेरणादायी आणि सामाजिक बांधिलकी जपत गेवराई येथील बालग्राम अनाथ आश्रमात खाऊ वाटप करून उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त आश्रमातील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

सामान्यतः वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात; मात्र समाजातील गरजू आणि निराधार मुलांसोबत आनंद वाटून घेण्याचा संदेश संतोष रासवे यांनी आपल्या कृतीतून दिला. या उपक्रमामुळे सामाजिक जाणिवा जपण्याचा आणि समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखण्याचा आदर्श निर्माण झाला आहे.

या प्रसंगी पत्रकार परमेश्वर सोळंके, बाळासाहेब आडागळे, प्रचंड सोळंके, महादेव आढाव यांच्यासह बालग्राम अनाथ आश्रमातील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी संतोष रासवे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, यश आणि सामाजिक कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. वाढदिवसाच्या निमित्ताने केलेल्या या सामाजिक उपक्रमामुळे परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, अशा उपक्रमातून समाजात माणुसकी आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## ६० लाखांच्या दरोडा प्रकरणातील आरोपींना 'डिफॉल्ट बेल';वेळेत चार्जशीट दाखल न झाल्याने न्यायालयाचा निर्णय-अॅड.अर्जुन आडे

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगांव येथील अमोल ज्वेलर्सचे व्यावसायिक अमोल गायके यांच्यावर झालेल्या सुमारे ६० लाख रुपयांच्या दरोडा प्रकरणातील आरोपींना अखेर न्यायालयाकडून 'डिफॉल्ट बेल' मंजूर करण्यात आला आहे. तपास अधिकाऱ्यांकडून कायद्याने निश्चित केलेल्या मुदतीत दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल न झाल्याने न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

दि. २५ जानेवारी २०२६ रोजी अमोल गायके हे सोन्या-चांदीचे सुमारे ६० लाख रुपये किमतीचे दागिने घेऊन तालखेड येथील बाजारात विक्रीसाठी जात होते. त्यावेळी आरोपी कृष्णा निरडे, अभिषेक शिंदे व इतरांनी मोटारसायकलवरून त्यांचा पाठलाग करून त्यांची गाडी अडवली. आरोपींनी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करून दागिन्यांची लूट केली होती.या प्रकरणी माजलगांव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३०/२०२६ अन्वये इछड कलम ३१०(२), ३०९(४), १२६(२) तसेच भारतीय शस्त्र कायदा कलम ४/२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी एकूण पाच आरोपी निष्पन्न केले होते.यापूर्वी आरोपी कृष्णा निरडे व



अभिषेक शिंदे यांच्या वतीने सत्र न्यायालयात नियमित जामिनासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता. मात्र, तपास सुरू असल्याचे कारण देत न्यायालयाने तो अर्ज फेटाळला होता. दरम्यान, कायद्यानुसार अटकेपासून ९० दिवसांच्या आत, म्हणजे दि. ३० एप्रिल २०२६ पर्यंत दोषारोपपत्र दाखल करणे आवश्यक होते. मात्र, संबंधित मुदतीत चार्जशीट दाखल न झाल्याने आरोपींच्या वतीने ड. अर्जुन बी. आडे यांनी 'डिफॉल्ट बेल'साठी अर्ज दाखल केला.

प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, माजलगांव यांनी कायदेशीर तरतुदींचा विचार करून व वेळेत दोषारोपपत्र दाखल न झाल्याच्या कारणास्तव आरोपी कृष्णा निरडे व अभिषेक शिंदे यांना डिफॉल्ट बेल मंजूर केला.या प्रकरणात ड. अर्जुन आडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांना ड. दत्ता आडे, ड. नम्रता राठोड व ड. सचिन राठोड यांनी सहकार्य केले.

*विशेष:*या निर्णयामुळे 'डिफॉल्ट बेल' संदर्भातील कायदेशीर तरतुदी पुन्हा एकदा चर्चेत आल्या असून तपास यंत्रणांनी वेळेत दोषारोपपत्र दाखल करण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

## सातेफळ नगरीत युवा उद्योजक व्यंकटराव पाटील लोखंडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**पुर्णा । प्रतिनिधी**

सातेफळ नगरीचा अभिमान असलेले युवा उद्योजक व्यंकटी पाटील लोखंडे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी मित्रपरिवार आणि शुभचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात चरण पाटील कापसे, हाणुमंत पाटील मोहीते,हारीओम पाटील लोखंडे,ज्ञानुमामा वाके, सुनिल पाटील तराशे , विठ्ठल वानखेडे,सुनिल वाके,मनोहर डाखोरे, संजय जोशी, यांच्यासह मित्रपरिवाराने केक कापून व हार घालून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

व्यंकटी पाटील लोखंडे हे मनमिळाऊ स्वभाव, साधेपणा आणि बुद्धिमत्तेचा सुंदर संगम असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. एक यशस्वी उद्योजक म्हणून त्यांनी जेसीबी मशीन व ट्रॅक्टरच्या माध्यमातून अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. शेती आणि बांधकाम क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

त्यांच्या कष्टाळूपणा आणि प्रामाणिकपणामुळे त्यांनी व्यवसायात वेगळी ओळख निर्माण केली असून,



समाजातील प्रत्येक घटकासाठी ते सदैव मदतीला धावून जातात. श्रीमंत-गरीब असा भेदभाव न करता सर्वांशी समानतेने वागणे आणि गरजूंना वेळोवेळी मदत करणे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच ते दोस्तीच्या दुनियेतील राजा माणूस म्हणून सर्वांच्या मनात स्थान निर्माण करून आहेत.

सामाजिक कार्यातही त्यांचा सहभाग उल्लेखनीय असून, अनेकांना त्यांच्या मार्गदर्शनातून नवी दिशा मिळाली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त उपस्थितांनी त्यांना भावी सरपंच तसेच पुढे जिल्हा परिषद सदस्य म्हणून जनतेची सेवा करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थितांनी आई तुळजाभवानीच्या चरणी प्रार्थना करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि यश लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त केली.

# बदामराव पंडित,बाळराजे पवार यांच्या नेतृत्वाखाली जळगाव मंजरातील असंख्य कार्यकर्त्यांचा भाजप प्रवेश

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यात लोकहिताच्या कामांमध्ये सत्तेत असलेल्या लोकप्रतिनिधीकडून होत असलेल्या अडवणुकीला कंटाळून मौजे जळगाव मंजरा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि भाजपा नेते बाळराजे पवार यांचे नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.



जळगाव मांजरा येथे झालेल्या या प्रवेश सोहळ्यास यावेळी माजी जि प सदस्य शामराव राठोड, माजी पं स उपसभापती भीष्माचार्य दाभाडे, माजी सरपंच सुभाषराव शिंदे, सरपंच सूर्यकांत शिंदे, दत्तप्रसाद जाधव, सरपंच कैलास माने, विजय डरफे, बंडू घोलप, मा. मुकुंद लांडे, सरपंच रितेश साबळे, कल्याण लांडे, माजी सरपंच महादेव खेत्रे, सरपंच नारायण गाडे, चेअरमन रमेश गायकवाड, महारुद्र खुणे, शहादेव बोबडे, विकास मीठे (फौजी), सुरेश लाखे, प्रकाश गाडे, गोकुळ घवाडे, उमेश खेत्रे, दामू मोरे आदींचे प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, आज अभिमान वाटतो की, माझ्यासोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची तिसरी पिढी आजही माझ्यासोबत काम करत आहे. मी आणि दादा मिळून आपणास येणाऱ्या प्रत्येक अडचणीवर मात करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर असल्याचे सांगून कार्यकर्त्यांनी एक जीवाने गावाच्या माणसाच्या विकासासाठी आणि भल्यासाठी काम करावे तुमच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे. तुमचे कोणतेही काम अडवले जाणार नाही जर कोणी अडवत असेल तर त्याची माझ्याशी गाठ असेल असा इशाराही त्यांनी विरोधकांना दिला.
बाळराजे पवार म्हणाले की, जळगाव मांजरा हे गाव मी व आबांनी आजच दत्तक घेतले. या गावातील गावकऱ्यांच्या समस्या आम्ही जातीने लक्ष घालून सोडवू.रेशमांच्या धाग्यांनी श्रीमंतीचं स्वप्न साकारणार जळगाव मंजरा हे गाव. या गावातील तरुणांनी आपला स्टेटस बनवण्यासाठी कष्ट घ्यावेत. आपल्या कष्टावर मौज करणाऱ्या नेत्यांना आजच्या तरुणांनी लवकरच ओळखले पाहिजे. आपले प्रश्न सोडवण्यासाठी मी सदैव कटिबद्ध असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिट्टी देऊन पंडित जिजा ईदगे, अनंतराव आंडिल, महारुद्र खुणे, गोविंद खुणे, श्याम इदगे, शहादेव बोबडे, राजाभाऊ इदगे, भाऊसाहेब जामकर, विठ्ठल खुणे, शहाजी इदगे, बापू ईकर, महादेव खुणे, दत्ता खुणे, झुंबर इदगे, दामोदर इदगे, संदिपान इदगे, संजय बोबडे, केशव इदगे, छत्रभुज इदगे, दादा इदगे, बदाम इदगे, ज्ञानेश्वर इदगे, माऊली जामकर, माऊली बोबडे, सुभाष इदगे, आनंद कांबळे, शहादेव खुणे, माऊली खुणे, रुस्तुम इदगे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी गावकऱ्यांसह पंचक्रोशीतील भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्यानगर येथील गटविकास अधिकारी राजेंद्र देसले यांची कोपरा गावाला भेट

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नांदेडच्या नायगाव तालुक्यातील येथील मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सर्वोत्कृष्ट काम केलेल्या कोपरा गावला आज दिनांक ६ एप्रिल रोजी अहिल्यानगर येथील गटविकास अधिकारी श्री राजेंद्र देसले, मेहेत्रे उ.ऊझ.ज, चंद्रकांत खांडे विस्तार अधिकारी प्रसाद पवार बी एम आदींनी कोपरा येथील गावांना भेट दिली व पाहणी केली गावांतील समशानभूमी परिसरातील स्वच्छता तेथील शिवमंदिर जे पवळे सर यांनी स्वखर्च्यातून त्यांचे चुलते कै पवळे यांच्या स्मरणार्थ बांधले, गावात सर्वत्र असलेली स्वच्छता, जिल्हा परिषद शाळा, स्वच्छ अंगणवाडी, ग्रामीण भागातील मुलीला स्वातंत्र्य अभ्यासिकेची सोय, प्रसन्न धार्मिक स्थळ,ख.ड.ज मानांकन असलेली ग्रामपंचायत परिसर सर्वत्र गावभर पाहून अधिकारी भारावून गेले व आनंद व्यक्त केले यावेळी गावच्या महाराष्ट्र कोहिनूर रत्न २०२६ पुरस्कार प्राप्त आदर्श सरपंच सौ. छायाताई केशवराव पवळे , व उपसरपंच कैलास वजीरगावे सरपंच तथा माजी ग्रामपंचायत अधिकारी श्री केशवराव पवळे यांच्या वतीने अहिल्यानगर येथील गटविकास अधिकारी राजेंद्र देसले यांचा नांदेड येथील प्रसिद्ध गुरुद्वारांची प्रतिमा साडेतीन पिठा पैकी एक असलेली नांदेडच्या माहूर येथील रेणुका मातेची प्रतिमा संत तुकाराम महाराजांची गाथा शाल व पुष्पहार घालून त्यांचा सन्मान करण्यात आला यावेळी नायगाव पंचायत विस्तार अधिकारी प्रकाश जाधव ग्रामपंचायत अधिकारी सूर्यवंशी वाघमारे ग्रामपंचायत कार्यालय कोपरा येथील ग्रामपंचायत कैलास व जिल्हा सरपंच प्रतिनिधी माजी ग्रामपंचायत अधिकारी केशवराव आनंदराव पवळे ग्रामपंचायत सदस्य वाघमारे अंगणवाडी सेविका आशाताई बचत गटाच्या महिला यासह नागरिक उपस्थित होते.



# ‘भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेत’ पुणे येथील जीएसटी संघाने मारली बाजी

## अक्षय मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त केजमध्ये खेळाचा थरार

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिन आणि युवा नेते अक्षय भैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून केज येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचा समारोप अत्यंत उत्साहात पार पडला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या संघांनी आपल्या अष्टपैलू खेळाने प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.अंतिम सामन्यात पुणे येथील जीएसटी संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर आपले नाव **कोरले.**

**मैदानावरील चुरस आणि निकाल**

स्पर्धेमध्ये विजेत्या ठरलेल्या संघांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. स्पर्धेचा



अंतिम निकाल खालीलप्रमाणे राहिला.
प्रथम पारितोषिक विजेता पुणे जीएसटी टीम,द्वितीय पारितोषिक अमन संघ,बीड,तृतीय पारितोषिक अमन बी संघ,बीड,चतुर्थ पारितोषिक किनवट संघ नांदेड,

**वैयक्तिक कामगिरीचा गौरव**

केवळ सांघिकच नव्हे, तर वैयक्तिक कौशल्यात ही खेळाडूंनी चमक दाखवली.स्पर्धेतील मानकरी ठरलेले खेळाडू मॅन ऑफ द मॅच- हर्ष चौधरी,बेस्ट स्मॅशर- वाजिद सय्यद,बेस्ट सर्व्हिस- शोएब सय्यद, बेस्ट लिब्रो- पांड्या

**मान्यवरांच्या उपस्थितीत**

बक्षीस वितरण संपन्न झाले.समारंभाला रणजीत सिंह पाटील, पीएसआय फारुख कादरी,कबीर इनामदार, अकबर इनामदार, प्रकाश मुंडे पत्रकार, विनोद गुंड सर,रमजान भाई,एत्तेशाम कादरी आणि वसीम शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिशान कादरी आणि खद्दीर कुरेशी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी सर्व खेळाडू,पंच,मान्यवर आणि क्रीडाप्रेमींचे आभार मानले.या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक मंडळाचे संपूर्ण तालुक्यातून कौतुक होत आहे.

# चौसाळा शहरात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन-प्रदीप जोगदंड

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

शिवपुत्र धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या सार्वजनिक जयंती निमित्त बीड तालुक्यातील चौसाळा येथे विविध समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहीती धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक प्रदीप(भाऊ)जोगदंड यांनी दिली आहे. दिनांक १४ मे २०२६ रोजी चौसाळा शहरात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन केले असुन तसेच चौसाळा शहरातुन धर्मवीर संभाजी महाराज यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक प्रदीप(भाऊ)जोगदंड यांनी दिली आहे.



# राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा;तूर आणि हरभरा खरेदीला केंद्र सरकारकडून मुदतवाढ

## हरभरा खरेदीच्या उद्दिष्टात ५८ हजार टनांची वाढ,पणनमंत्री जयकुमार रावल यांची माहिती

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील तूर आणि हरभरा उत्पादक शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे.खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत तूर आणि हरभरा खरेदी साठी मुदतवाढ देण्या सोबतच,हरभरा खरेदीच्या उद्दिष्टात ५८ हजार ६३२ मेट्रिक टनांची मोठी वाढ करण्यात आली आहे.या निर्णयामुळे राज्यातील हजारो शेतकऱ्यांना आपला शेतमाल आधारभूत किमतीत (MSP) विकण्यासाठी अतिरिक्त वेळ आणि संधी उपलब्ध झाली आहे.

**मुदतवाढ आणि सुधारित उद्दिष्ट**

राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी या निर्णयाची माहिती दिली.त्यांच्या विनंती नुसार केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी या मुदतवाढीला मंजुरी दिली आहे.आता तूर खरेदीची मुदत ३१ मे २०२६ पर्यंत,तर हरभरा खरेदीची मुदत २९ मे २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे.तसेच, राज्यासाठी हरभरा खरेदीचे एकूण उद्दिष्ट आता ८ लाख १९ हजार ८८२ मेट्रिक टन इतके झाले आहे.



**राज्य शासनाचा यशस्वी पाठपुरावा**

यापूर्वी किमानआधारभूत किंमत (MSP) योजने अंतर्गत तूर खरेदीसाठी ९० दिवस आणि हरभरा खरेदीसाठी ६०दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला होता. मात्र,अनेक शेतकऱ्यांचा माल अद्याप विक्रीविना असल्याने मुदत वाढवून देण्याची मागणी होत होती.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पणन विभागाने केंद्र सरकार कडे यासंदर्भात विशेष पाठपुरावा केला होता.

**शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण**

या निर्णयाबद्दल पणन मंत्री जयकुमार रावल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांचे आभार मानले आहेत.हरभरा खरेदीच्या कोट्यात झालेली वाढ आणि दोन्ही पिकांच्या खरेदीला मिळालेली मुदतवाढ यामुळे शेवटच्या शेतकऱ्याचा माल खरेदी करणे सरकारला शक्य होईल,असा विश्वास मंत्री रावल यांनी व्यक्त केला. राज्य सरकारच्या या यशस्वी प्रयत्नांमुळे बळीराजाला मोठे आर्थिक संरक्षण मिळाले असून सर्वत्र समाधानाचे वातावरण आहे.

# गप्पेवाडीत मृत्यूचा सापळा! जमिनीला टेकलेल्या वीजतारांमुळे ग्रामस्थांचा जीव धोक्यात ; महावितरणचा बेजबाबदारपणा टोकाला

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील गप्पेवाडीयेथील बाराभाई वस्ती ते महादेव वस्ती दरम्यान महावितरणचा भोंगळ कारभार समोर आला आहे.येथील उच्च दाबाच्या (३-फेज) वीज तारा अक्षरशः जमिनी लगत लोंबकळत असून, कधीही मोठी जीवित हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वारंवार तक्रारी करूनही विडा उपकेंद्रातील अधिकारी याकडे डोळेझाक करत असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

**नेमकी परिस्थिती काय?**

गप्पेवाडीतील या मुख्य मार्गावर बाराभाई वस्ती पासून महादेव वस्तीपर्यंत विजेच्या तारा अत्यंत धोकादायक स्थितीत आहेत.या तारा इतक्या खाली आल्या आहेत की, रस्त्यावरून चालणाऱ्या नागरिकांच्या डोक्याला त्या कधीही स्पर्श करू शकतात.या परिसरात अहोरात्र वर्दळ आहे.याच मार्गावरून लहान मुले, शाळकरी विद्यार्थी आणि शेतकरी आपल्या जनावरांसह ये-जा करतात.तसेचभाविकांचा राबता जवळच मंदिर असल्याने महिला आणि वयोवृद्धांची येथे मोठी गर्दी असते.पावसाळा तोंडावर असल्याने जमीन ओलसर होऊन विजेचा प्रवाह जमिनीत उतरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**प्रशासनाची गाढ झोप आणि ग्रामस्थांचा संताप**

मिळालेल्या माहिती नुसार,ग्रामस्थांनी या गंभीर समस्येबाबत विडा उपकेंद्र येथील महा वितरण कार्यालयात अनेकवेळा लेखी व तोंडी तक्रारी केल्या आहेत. मात्र,ढिम्म प्रशासनाने अद्याप याकडे ढुंकूनही पाहिलेले नाही.एखाद्या निष्पाप जीवाचा बळी गेल्यावरच प्रशासनाला जाग येणार काय?असा संतप्त सवाल गावकऱ्यांनी उपस्थित केला आहे.आम्ही रोज जीव मुठीत धरून येथून प्रवास करतो.महावितरण च्या अधिकाऱ्यांना अनेकदा सांगितले,पण ते याकडे दुर्लक्ष करत आहेत.जर उद्या एखादी दुर्घटना घडली,तर त्याला जबाबदार कोण?असा सवाल संतप्त ग्रामस्थ विचारत आहेत.

**आंदोलनाचा इशारा**

महावितरणच्या या जीवघेण्या निष्काळजी पणामुळे गप्पेवाडीकर आता आक्रमक झाले आहेत.जर येत्या दोन - तीन दिवसांत या वीज तारांची दुरुस्ती करून त्या उंच करण्यात आल्या नाहीत, तर विडा उपकेंद्रा वर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीला महावितरण प्रशासनच सर्वस्वी जबाबदार असेल,असेही गावकऱ्यांनी स्पष्ट केले आहे.आता तरी महा वितरणचे वरिष्ठ अधिकारी या प्रकरणाची दखल घेऊन मृत्यूचा हा सापळा हटवणार की पुन्हा एखाद्या दुर्घटनेची वाट पाहणार,हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077